Estd:1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संबंधित विविध घटक, विद्यार्थी संघटना व सामाजिक संस्था यांचेकडून विद्यार्थी केंद्रीत कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सभागृहे व वसतीगृहे मोफत उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली जाते. याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेनुसार अशा कार्यक्रमासाठी सभागृहे उपलब्ध करुन देणेसंदर्भात खालील प्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व संबंधितांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

१) विद्यापीठाच्या अधिविभागाचा तसेच पूर्ण शासकीय केंद्रीत कार्यक्रम असतील तर सभागृह मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अन्य संस्थांचे वैयक्तिक कार्यक्रम असतील तर पूर्वी गठित समितीच्या दि. २७/६/२०१७ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार खालील मंजूर दराप्रमाणे कार्यक्रमासाठी देणगी स्वरुपात निधी स्विकारण्यात यावा.

| अ. क्र. | सभागृह | प्रतिदिन | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | शाहू सभागृह<br>(With A/C)<br>(Without A/C ) | रु. ३०,०००/—<br>रु. २०,०००/— | रु. १०,०००/— |
| २. | वि.स. खांडेकर सभागृह | रु. १५,०००/— | रु. ५,०००/— |
| ३. | मानव्यशास्त्र सभागृह | रु. ५,०००/— | रु. ५,०००/— |
| ४. | लोककला सभागृह | रु. २०,०००/— | रु. ५,०००/— |
| ५. | पदार्थविज्ञान, गणितशास्त्र व शिक्षणशास्त्र | रु. २,०००/— | रु. १,०००/— |
| ६. | संगीतशास्त्र | रु. १०,०००/— | रु. ५,०००/— |
| ७. | रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र व पर्यावरणशास्त्र | रु. ५,०००/— | रु. ३,०००/— |

३) विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने अन्य संस्थाचे विद्यार्थी केंद्रीत कार्यक्रम असतील तर अभियांत्रिकी विभागाने निश्चित केलेले दर समितीच्या दि. २७/०६/२०११ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर दराच्या (उपरोक्त क्र.२ मधील तक्त्यानुसार) २५ टक्के निधी स्विकारण्यात यावा.

४) अन्य संस्थांचे कार्यक्रमांसाठी विद्यापीठातील फक्त लोककला सभागृह व वि.स.खांडेकर (भाषा भवन) सभागृह उपरोक्त नियमानुसार उपलब्ध करुन द्यावे.

५) विविध कार्यक्रमांसाठी विद्यार्थी/ विद्यार्थिनीच्या सुटीच्या कालावधीशिवाय वसतिगृहे उपलब्ध करुन देण्यात येवू नयेत.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 2592
दिनांक : 27 SEP 2017

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. स्वीय सहाय्यक मा.कुलगुरु, मा. प्र—कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी
४. इंटरनेट विभाग— सदरचे परिपत्रक INTRA NET वर प्रसिध्द करावे.